Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 18 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १८ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

विधानपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी उद्या निवडणूक होणार असून, महायुतीने प्राध्यापक राम शिंदे यांना उमेदवारी दिली आहे. ते आज उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

****

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल नागपुरात विधान भवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि महायुतीच्या विजयाबद्दल अभिनंदन केलं. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संवादाची या राज्याला दीर्घ परंपरा आहे. त्यांच्या नेतृत्त्वाखाली राज्याची आणखी प्रगती होईल, अशा शुभेच्छा दिल्याचं उद्धव ठाकरे यांनी या भेटीनंतर वार्ताहरांना सांगितलं. त्यानंतर ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली आणि अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

****

दहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ते आज पाचव्या स्थानापर्यंतचा भारताचा प्रवास जागतिक आणि देशांतर्गत आव्हानांच्या टप्प्यात अविश्वसनीयपणे वेगवान वाढीचा आहे, असं मत नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन के. बेरी यांनी व्यक्त केलं आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. नीती आयोग, कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले आणि इंदिरा गांधी इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय ‘भारताच्या बहुविध संक्रमणांवर आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या अनुषंगाने ते बोलत होते. सर्वात उत्तम अर्थव्यवस्था आपल्याला व्हायची असेल तर गुंतवणूक वाढली पाहिजे, या संदर्भात या कार्यशाळेत चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. वातावरणातील बदल आणि नागरिकीकरण ही महत्वाची आव्हानं असताना आमची भूमिका ही पुढचे दहा वर्ष कसे असतील ही असल्याचं बेरी यांनी नमूद केलं.

****

लोकसभेत काल ८७ हजार ७६२ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर झाल्या. भारत हा जगात सर्वाधिक वृद्धी दर नोंदवणारा देश आहे. गेले तीन वर्ष देशाचा वृद्धीदर सरासरी ८ पूर्णांक ३ दशांश टक्के होता, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या संदर्भातल्या चर्चेला उत्तर देताना सांगितलं. केंद्र सरकारनं ११ लाख कोटी रुपयांहून अधिक खर्च पायाभूत सुविधांवर करायचा ठरवला आहे. त्यामुळे येत्या काही वर्षात अर्थव्यवस्था आणखी मजबूत होईल, असं त्या म्हणाल्या. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारच्या तुलनेत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात किरकोळ, खाद्य आणि इंधन महागाई मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

****

करदात्यांना अधिक सेवा देण्याच्या उद्देशानं चार नव्या उपक्रमांची घोषणा केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाचे अध्यक्ष संजय कुमार अगरवाल यांनी केली. या चार उपक्रमांमध्ये नागरिकांची सनद, संपूर्ण करसंबंधित माहितीसाठी सुविधा केंद्र, सूचना करण्यासाठी व्यवसाय सुलभता टॅब आणि कर भांडारासाठी सी बी आय सी संग्रह यांचा समावेश आहे. यामुळे करसेवेमध्ये पारदर्शकता आणि विश्वास वाढीस लागेल. करदात्यांना सक्षम बनवून आणि त्यांच्या सूचनांचा समावेश करून, एक सुलभ प्रणाली तयार केली जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

****

नागपूरमधल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला चालना देण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून एक हजार ५४७ कोटी रुपयांचं अर्थसहाय्य मिळणार आहे. विधानभवनातल्या मंत्रिमंडळ सभागृहात काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे नागपूर शहरासह परिसराच्या विकासाला आणखी गती मिळेल, असं फडणवीस यांनी सांगितलं. नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी आशियाई विकास बँक आणि यूरोपीयन इन्वेस्टमेंट बँक यांच्याकडून एकूण तीन हजार ५८६ कोटी रुपयांचा वित्तपुरवठा करण्यात येणार आहे.

****

धुळे जिल्ह्यातल्या पळासनेर जंगलात पैशांचा पाऊस पाडण्याच्या वादातून गोळीबार करण्यात आला. याप्रकरणी धुळे पोलिस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि शिरपूर तालुका पोलिसांनी मध्यप्रदेशमधल्या खंडवामधून चौघांना अटक केली

आहे. जादूटोणा कायदा कलमान्वये तक्रारदारासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुडाळ तालुक्यात येत्या २१ ते २७ डिसेंबर दरम्यान बंधारे मोहीम आयोजित करण्यात आली आहे. प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात बंधारे बांधण्यासाठी अंगणवाड्या, युवक क्रीडा मंडळ, बचतगट, स्वयंसेवी संस्था, विविध कर्मचारी संघटना आणि ग्रामस्थांना सहभागी करुन घेतलं जाणार आहे. गेली सहा वर्ष कुडाळ पंचायत समिती कोणत्याही शासकीय निधीशिवाय केवळ लोकसहभागातून बंधारे मोहीम राबवत आहे.

****

ग्रामीण भागातल्या नागरिकांना दरडोई ५५ लिटर शुद्ध पिण्याचं पाणी मिळावं, या उद्देशानं राज्य शासनानं जलजीवन मिशन योजना सुरू केली आहे. या अंतर्गत सातारा जिल्ह्यात एक हजार १०० कामं मंजूर असून, ही कामं पुढच्या वर्षाच्या मार्च महिन्यापर्यंत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

****

राज्यात सध्या थंडीचा प्रचंड कडाका जाणवत असून, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****